## श्री सोमेश्वर सहकारी साखर कारखाना लि. सोमेश्वरनगर
## ता. बारामती, जि. पुणे

दिनांक :-१३/०५/२०२६

### -: परीपत्रक :-

कारखान्याचे ऊस उत्पादक सभासद यांना कळविणेत येत आहे की, आपले कारखान्याचा सन २०२६-२७ चा लागण हंगाम दि.०१ जुलै २०२६ पासुन सुरु होत आहे. कार्यक्षेत्रातील सभासदांचे एकरी ऊस उत्पादन वाढविणेच्या दृष्टिने संचालक मंडळाने सभासदांसाठी ऊस रोपे व बेणे वाटप धोरण ठरविले आहे. ( लागण हंगाम व ऊस जातींबाबत माहिती लागण परिपत्रकामध्ये दिलेली आहे.)

१) ऊस रोपांचे बुकिंग दि.२५/०५/२०२६ रोजी पासुन चालु होत आहे.

२) लागण परिपत्रकातील सर्व जाती प्रती रोप १ रु. प्रमाणे ॲडव्हान्स रक्कम भरुन बुकिंग केले जाईल व उर्वरीत रक्कम सभासदांचे नजीकच्या ऊस बिलातुन अथवा सभासदांना कारखान्याकडुन देय असना-या कोणत्याही रकमेतुन कपात केली जाईल.

३) सभासदांनी गट ऑफिस मधुन रोपे मागणी अर्ज घेऊन त्यावर शेती विभागातील शेती मदतनीस व ॲग्री ओव्हरसिअर यांच्या सह्या घेऊन कारखान्यावर यावे.

४) मागणी अर्ज़ा सोबत सभासदाचे फोटो ओळखपत्राची झेरॉक्स प्रत जोडणे आवश्यक आहे.

५) ऊस रोपे सभासदांना शेअर्सच्या प्रमाणात देणेत येतील. (एका शेअर्स साठी एक एकराची रोपे)

६) कारखान्याने करार केलेल्या नर्स-यांची यादी कारखाना गट ऑफिस मध्ये व कारखान्यावरती ऊस विकास विभागात लावलेली आहे.

७) सभासदांनी मागणी अर्जावरती कारखान्याने करार केलेल्या नर्सरी मधील नर्सरीचे नांवाचा उल्लेख स्वत: करावयाचा आहे. रोपांचे दर हे नर्सरी नुसार व जाती नुसार वेगवेगळे आहेत.

८) ऊस रोपांचे वाटप बुकिंग नंबर नुसार करणेत येईल. ऊस रोपे पुरवठा करते वेळी नर्सरीची ऊस रोपे उपलब्धता व त्यांची ऊस रोपे वाटप करणेच्या क्षमते नुसार वाटप केले जाईल.

९) कारखान्यामार्फत पुरविणेत येणा-या ऊस रोपांबाबत काही तक्रार असलेस त्वरीत ऊस विकास विभागाशी संपर्क साधावा.

१०) लागण परिपत्रकातील सर्व जातींची ऊस बेणे टिपरी कारखान्यामार्फत उधारीने पुरविणेत येणार असुन त्याची रक्कम प्रती १००० टिपरीसाठी रक्कम रु. १२००/- असणार आहे. प्रती एकर दोन डोळ्याची ८००० टिपरी देणेत येणार आहेत.

११) कारखान्यामार्फत पुरविणेत येणारी व्हि.एस.आय. ची टिशुकल्चर ऊस रोपे (को.८६०३२, को.एम. ०२६५, एम.एस.१०००१, फुले ऊस १३००७) ही रक्कम रु.१०/-प्रती रोप असुन त्यामधील रक्कम रु.३/-प्रती रोप महाराष्ट्र शासनाकडुन अनुदान देणेत येणार असुन रक्कम रु.२/-प्रती रोप कारखान्याकडुन अनुदान देणेत येणार आहे. त्यामुळे सभासदांना ही रोपे रक्कम रु.५/- प्रती रोप कारखान्याकडे भरुन बुकिंग करता येणार आहेत. टिशुकल्चरची ही रोपे प्रती सभासद जास्तीत जास्त २०० रोपे व कमीत कमी १०० रोपे या प्रमाणात बुकिंग करावी लागणार आहेत. सदर रोपे कारखाना मार्फत कारखाना साईट वरती मिळतील.

**आपले नम्र**

**( राजेंद्र ना. यादव )**
कार्यकारी संचालक

**(मिलिंद ब. कांबळे)**
व्हा.चेअरमन

**( पुरुषोत्तम रा. जगताप )**
चेअरमन

**व**

**संचालक मंडळ**